# पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास

**डॉ. शिरीष सांगोळे**
सहा. प्राध्यापक

**सुनिल कायंदे**
संशोधक विद्‌यार्थी

**गोषवारा**

शाश्वत म्हणजे कायम राहणारा सामान्यपणे अखंडित किंवा सतत कायम चालणारा आणि विकास म्हणजे वृध्दी किंवा वाढ म्हणजेच शाश्वत विकास म्हणजे वर्षानुवर्ष अखंडपणे चालु राहणारा विकास हा विकास होत असताना पर्यावरणातुन प्राप्त होणाऱ्या संसाधनाला कोणत्याही प्रकारचा ऱ्हास होणार याची काळजी घेणे आवश्यक आहे. मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी संसाधने पर्यावरणातुन प्राप्त होतात. म्हणुन पर्यावरण जेवढया चांगल्या स्थितीत राहील तेवढाच विकास अधिक होईल. मानवाने पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धन याकडे दुर्लक्ष करुन केलेला विकास हा शाश्वत स्वरुपाचा असु शकत नाही.

**बीज संज्ञा :-** पर्यावरण शाश्वत विकास

**प्रस्तावना:-**

मानवी जीवन हे पूर्णपणे निसर्गावर अवलंबुन आहे. मानव आपले जीवन सुखसोयींचे व सुरक्षित व्हावे. म्हणुन सतत प्रयत्न करत असतो. त्यासाठी ती निसर्गातुन मिळणाऱ्या विविध प्रकारच्या स्त्रोतांचा वापर करत असतो हे करत असताना या नैसर्गिक स्त्रोतांना कोणत्याही प्रकारची हानी जर न पोहचवता त्यांचा योग्य प्रकारे उपयोग करून घेतल्यास शाश्वत विकास साधता येतो. शाश्वत विकासा मध्ये पर्यावरणीय घटक मानवी घटक सामाजिक घटक आणि आर्थिक घटक या सर्वांचा समावेश होतो.

**शाश्वत विकासाची व्याख्या:-**

पृथ्वीतलावर येणाऱ्या भावी पिढयांच्या गरजा भागविण्या इतपत पर्यावरणाची गुणवत्ता कायम राखुन वर्तमान पिढयांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने साधण्यात येणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय.

मानव आपला विकास करण्यासाठी निसर्गात उपलब्ध होणाऱ्या विविध संसाधनाचा उपयोग करत असतो. हे करत असताना निसर्गाला कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही याची काळजी घेणे ही मानवाची जबाबदारी आहे. मानवाच्या अवाजवी हस्तक्षेपामुळे निसर्गात बदल घडवुन येतो त्यामुळे विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. मानवाच्या

गरजा विविध प्रकारच्या व अमर्याद स्वरूपाच्या आहेत. मानवाने आपल्या गरजा पुर्ण करण्यासाठी पर्यावरणात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक संसाधनाचा वापर योग्य केला तरच शाश्वत विकास करणे शक्य होणार आहे. अन्यथा मानवाला विविध पर्यावरणीय समस्यांना तोंड दयावे लागणार आहे.

**पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास -**

मानव आपल्या विविध प्रकारच्या गरजा पुर्ण करण्यासाठी निसर्गातुन मिळणाऱ्या संसाधनांचा तो वापर करतो हा करत असताना मानवी अवाजवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. मानव आपल्या गरजा पूर्ण करतांना निसर्गात उपलब्ध होणाऱ्या साधनांचा योग्य प्रकारे वापर करुन पर्यावरणाचे संरक्षण हा संवर्धन करण्याची जबाबदारी मानवावर आहे. संयुक्त राष्ट्र संघाने देखील शाश्वत विकासावर भर दिलेला आढळून येतो यात प्रामुख्याने पर्यावरणपुरक शेती परीसरातील विविध प्रकारची जैवविविधता आणि जंगलाचे संवर्धन, वृक्षतोंडीवर निर्बंध प्रदुषणाला कमी करणे या बाबी महत्वांच्या आहेत. मानवाने निसर्गातील उपयुक्त संसाधनाचा मानवी विकासासाठी उपयोग करावा परंतु त्यामुळे पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. मानवाने निसर्गातील उपलब्ध संसाधनांचा अतिरेकी व अवास्तव वापरामुळे विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने जलप्रदुषण, वायुप्रदुषण, मृदाप्रदुषण, ओझोन क्षय यामुळे मानवाला विविध प्रकारच्या आव्हांनाना तोंड दयावे लागत आहे. त्यामुळे मानवी विकाससाठी संसाधनाचा वापर करत असताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेणे महत्वाचे आहे.

पर्यावरण सुरक्षित समृध्द आणि गुणवत्तापुर्ण असेल तरच मानवाचे अस्तित्व कायम राहील. पर्यावरणापासुन मानवाच्या सर्व गरजा पुर्ण होतात त्या बदलांना व पर्यावरणसुध्दा सजीवांनी केलेली हानी सहन करते. आणि त्यांच्याकडुन करण्यात आलेल्या संरक्षण व संवर्धनामुळे लाभान्वित होते. हेच शाश्वत विकासाचे सुत्र होय.

मानवाने आपल्या गरजा भागविण्यासाठी व स्वतःच्या विकासासाठी नैसर्गिक संसाधनाचा अती वापरामुळे त्यांचा मोठया प्रमाणावर ऱ्हास झाला. नैसर्गिक संसाधने मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत याचाही त्यात विसर पडलेला आहे. नैसर्गिक वायु खनिज, दगडी कोळसा, रसायने यांची अती वापरामुळे ही संसाधने संपुष्टात येणाच्या मार्गावर आहेत दुसरीकडे या संसाधनाच्या अती वापरामुळे भूमी, वायु, जल यांचे प्रदुषण होत आहे. विविध कारणांसाठी वनांचा विनाश केला त्यामुळे वातावरणातील प्रदुषणामुळे ओझोन वायुचे सुरक्षा कवच नष्ट होत आहे. त्यामुळे जीवनाला धोका निर्माण झाला आहे.

मानव प्रगती साधत असताना त्याने शाश्वत विकासासाठी पुर्नतः दुर्लक्ष केलेले आढळते मागील काही कालखंडामध्ये पर्यावरणाची अपरिमीत हानी झालेली आढळते त्याचे परिणाम मानवाला भोगावे लागले. असेच चालु राहिले तर मानवाने अस्तित्व धोक्यात येईल.

मानवाने कोणताही उदयोग, कारखाना, रस्ते, धरण उभारण्यापुर्वी संबंधित बाबींचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याचाही विचार करायला पाहिजे केला तर आपण शाश्वत विकास करत आहोत. आपले पर्यावरण हा आपल्या पूर्वजांचा अनमोल वारसा आणि आपल्या भावी पिंढयाचा ठेवा आहे व आपण पर्यावरणाचे स्वामी नसुन विश्वस्त आहोत ही भुमिका प्रत्येकाने स्वीकारून तसे अनुकरण केले तरच शाश्वत विकास शक्य आहे.

**समारोप:-**

शाश्वत विकास साधताना अनेक समस्याना सामोरे जावे लागते. एकीकडे विकास साधताना पर्यावरणीय संसाधनाचा अती वापरामुळे त्यांचा ऱ्हास होत आहे. परिणामी काही कालावधीत ती नष्ट होत आहे. परिणामी काही कालावधीत ती नष्ट होण्याची शक्यता आहे. विकास साधताना वेगवेगळया पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. एकुण विकास करताना पर्यावरण प्रदुषीत होणार नाही याची काळजी घेवुन व नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास होणार याची दक्षता घेवुन केलेला विकास खरा शाश्वत विकास ठरेल.

**संदर्भ**

1) घारपुरे विठठल (जुन 2002): साधनसंपत्ती भुगोल, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर
2) सावंत प्रकाश (2002): भारताचा भुगोल, फडके प्रकाश्न कोल्हापुर
3) पर्यावरण शास्त्र, डॉ. सुरेखा बापट
4) पर्यावरण परिस्थतीतीकी - डॉ. तुषार घोरपडे, युनकि ॲकेडमी, पुणे.
5) पर्यावरणशास्त्र- विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.